I.O करीता

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** श्रीरामपूर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0906 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 26/08/2023 01:26

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Date From (दिनांक पासून):** 25/08/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/08/2023
**Time From (वेळेपासून):** 13:10 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 26/08/2023 **Time (वेळ):** 01:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 26/08/2023 01:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्रीरामपुर ते संगमनेर जाणारे र,श्रीरामपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुरेश हरिभाऊ सवाई

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1965

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रामहंकळ वडगाव,श्रीरामपुर ,श्रीरामपूर शहर,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रामहंकळ वडगाव,श्रीरामपुर ,श्रीरामपूर शहर,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अंकुष सुभाष कडलग | | | 1. बटयाल मळा संगमनेर,संगमनेर, श्रीरामपूर शहर,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | संजय भगवान करडे | | | 1. मोरगे वस्ती ,श्रीरामपुर , श्रीरामपूर शहर,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |
| 3 | अनिस सुलेमान शेख | | | 1. निमगाव खैरी ,श्रीरामपुर , श्रीरामपूर शहर,अहमदनगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of Interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु. दराच्या 80 चलनी नोटा | 40,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दि. 26/08/2023मी सुरेश हरिभाऊ सवाई, वय 58 वर्षे, धंदा शेती रा.महंकळ वडगाव ता.श्रीरामपुर जि. अहमदनगर मो.नं. 9665560330समक्ष हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील पत्त्यावर माझे कुटूंबियासह राहणेस आहे. मी दि.07/06/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्री.गमे, ला.प्र.वि.अहमदनगर यांना संपर्क करून एका लोकसेवकाविरुध्द माझी लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि गमे यांनी मला श्रीरामपुर येथे सुरक्षित ठिकाणी दुचाकी व लाचेच्या रक्कमेसह हजर राहणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी दि.07/06/2023 रोजी माझे दुचाकी व लाचेच्या रक्कमेसह श्रीरामपुर येथे सुरक्षित ठिकाणी हजर राहिलो. त्यानंतर पोनि गमे हे त्यांचे स्टाफसह शासकिय वाहनाने आले. पोनि गमे यांनी स्वतःची ओळख सांगुन माझी ओळख करुन घेतली. व मला शासकिय वाहनात बसण्यास सांगितले. त्यांनतर पंच व स्टाफची मला ओळख करुन दिली. पोनि गमे यांचे सुचनेवरुन उपस्थित पंचांनी मला माझे नाव, पत्ता व तक्रार विचारली असता, मी माझे नाव वरीलप्रमाणे सांगून माझी तक्रार सांगितली की, मी वरील ठिकाणी परिवारासह रहात असुन '' माझी सुन नामे अर्चना सतिष सवाई हिचे नांवे मी महाराष्ट्र शेती महामंडळ, श्रीरामपूर यांचे मालकीचे हरेगाव मळा येथील गट नं.3 मधील 319 एकर शेती दहा वर्षांच्या करार पध्दतीने कसण्यास घेतली आहे. सदर क्षेत्रांपैकी सध्या 60 एकर ऊस लागवड केलेली आहे उर्वरित क्षेत्र सध्या मोकळे आहे. सदर शेतीस पाटबंधारे विभागाचे पाणी मिळते. सदर पाण्याकरीता दर तीन महिन्यांनी पाटबंधारे विभागाकडुन पाणी पट्टी आकारणी केली जाते. सध्या जानेवारी 2023 ते मार्च 2023 या कालावधीची 26,280/- रु. पाणीपट्टी आलेली आहे. अद्याप पावेतो मी ती पाणीपट्टी भरलेली नाही. त्यामुळे ती थकीत आहे. एप्रिल ते जुन या महिन्याची पाणीपट्टी जुलै महिन्यांत येते. यापुर्वी सदर पाण्याची पट्टी ही पाटबंधारे विभागाच्या कार्यालयात भरत होतो., परंतु आता त्यांनी नियम बदलल्यामुळे आम्ही आता शेती महामंडळाचे हरेगाव ता.श्रीरामपूर येथील कार्यालयात सदरची पाणीपट्टी भरतो. त्याची रितसर पावती आम्हांस मिळते. सध्या आमचे वरील शेतात 60 एकर ऊसाचे भरणे असून त्यापैकी 35 एकर करीता आम्ही आमचे शेतातील बोअर व विहीरीचे पाणी वापरतो. उर्वरित 25 एकरसाठी पाटबंधारे विभागाकडुन कालव्याचे पाणी घेतो. सदर पाणी देणारे पाटबंधारे विभागाचे कडलग भाऊसाहेब हे आमचे वरील शेतीस पाटबंधारे विभागामार्फत देण्यात येणारे पाणी चालू राहुन देण्यासाठी एकुण 85,000/- रु. ची मागणी करत आहेत. कडलग भाऊसाहेब हे मागत असलेली सदरची रक्कम ही लाच आहे मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. मी आज रोजी कडलग भाऊसाहेबांची भेट घेवुन त्यांचेशी आमचे वरील कसण्यासाठी घेतलेल्या शेतीस पाटबंधारे विभागाचे पाणी चालू राहुन देण्यासाठी चर्चा करणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करावी. माझेत व कडलग भाऊसाहेब यांचेत कोणत्याही प्रकारचा आर्थिक देण्याघेण्याचा किंवा उधारी उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच भांडण तंटा अगर वैर नाही. कडलग भाऊसाहेब यांनी लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझे बचतीमधुन हजर करील अशी तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि गमे यांचे सुचनेवरुन माझी तक्रार सापळा पथकातील पो.अमलदार पांढरे यांनी लिहिलेली आहे व त्यावर मी, पोनि गमे व पंचानी सहया केल्या. त्यानंतर माझे तक्रारी प्रमाणे लोकसेवक कडलग हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे ? लाचेची रक्कम कधी दयावयाची? व कुठे दयावयाची याबाबत लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोनि गमे यांनी मला भाऊसाहेब कडलग हे कोठे भेटतील याबाबत विचारले, त्यावेळी मी त्यांना ते माझे हरेगाव येथील कसण्यासाठी घेतलेल्या शेतीमध्ये भेटणार असल्याचे सांगितले. त्यावेळी

सापळा पथक शाराकिय वाहनाने व मी माझे दुचाकीने श्रीरामपुर येथुन हरेगाव येथे पोहचलो.पोनि गमे यांनी मला व पंच 1 यांना पडताळणी कारवाई दरम्यान करावयाचे कार्यवाहीबाबत सुचना दिल्या. तसेच व्हाईस रेकाॅर्डरचे व्रापराबाबत माहिती देवून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकून त्यामध्ये कोणतीही फाईल ध्वनीमुद्रीत नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन तो माझे गळ्यात अडकवुन शर्टचे आतमध्ये ठेवुन दिला. मला व पंच नं. 1 यांना लोकसेवक कडलग यांची भेट घेण्यासाठी माझे शेतातील षेडवर 14/03 वा माझी दुचाकी क्र. एम एच 17 सीएफ 3759 वरून रवाना केले. असता मी व पंच नं.1 असे आम्ही माझे षेतातील षेडवर जावुन थांबलो. त्यानंतर बराच वेळाने एका दुचाकीवरुन लोकसेवक कडलग यांचे हाताखाली काम करणारा अनिस षेख व त्याचेसोबत आणखी 1 इसम आले. त्यावेळी माझेत व अनिस षेख मध्ये पाणी पट्टी बाबत चर्चा झाली.त्यावेळी त्यांनी मला सांगितले की कडलग भाउसाहेब यांनी चाळीस हजार सांगितले. तसेच अनिस षेख यांनी त्यांचे मोबाईल वरुन भाऊसाहेब कडलग यांना फोन केला. त्यावेळी कडलग भाउसाहेब यांनी माझे सोबत मला आलेल्या पाणीपट्टी बाबत चर्चा करून नुसता उसाचा फॉर्म भरला असता तर दोन लाख रूपये पट्टी येती असे म्हणुन आता उस किती आहे तेवढेच सांगितले असलेबाबत माझेसोबत बोलणे केले त्यानंतर अनिस षेख यांनी फोन वरुन कडलग भाऊसाहेब यांना नाना म्हणत्यात फायनल किती दयायचे ते सांगा ? असे म्हणता कडलग यांनी त्यांना म्हणाव आता है ना आम्ही आमचा आकडा फिक्स झालाय, काय ते ठरवा दयायचे तर दया असे म्हणाले. त्यांनतर अनिस षेख व त्याचे सोबतचा इसम हे निघुन गेले. मी व पंच नं 1 असे आम्ही सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यावेळी पोनि गमे यांचे सुचनेवरुन पोकॉ पांढरे यांनी माझेकडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. मला व पंच नं.1 यांना भाऊसाहेब कडलग यांची भेट घेण्यासाठी रवाना केले पासुन परत येई पर्यन्तच्या हकीकतीबाबत विचारता आम्ही त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि गमे यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डर मधिल ध्वनीमुद्रीत संभाशण ऐकुन त्याबाबत खात्री केली. भाऊसाहेब कडलग यांचे सांगणे वरुन त्यांचे हाताखाली काम करणारे अनिस षेख यांनी माझ्याकडे स्पश्टपणे 40,000/-रु लाचेची मागणी केली असल्याने त्यांचेविरूध्द लाचेची सापळा कारवाई आयोजित करण्याचे ठरले. परंतु त्याबेळी अनिस षेख यांनी माझेकडे मागणी केलेली 40,000/- रु. लाचेची रक्कम उपलब्ध नसल्याने एक दोन दिवसात रक्कम उपलब्ध झाल्यावर कळवितो असे पोनि गमे यांना सांगितले होते. दरम्यान मी आशाढी वारीनिमित्त पंढरपुर येथे गेलो. पंढरपुर वरुन आल्यावर मी पोनि गमे यांना फोन करून लाचेची रक्कम उपलब्ध झालेबाबत कळविले. ्याप्रमाणे दि.03/07/2023 रोजी पोनि गमे हे त्यांचे स्टाफसह हरेगाव ता.श्रीरामपुर येथे आले.पोनि श्री.गमे यांनी मला कडलग यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, मी 40,000/- रु., त्यात 500/-रु दरांच्या 80 चलनी नोटा हजर केल्या. त्यानंतर अँन्थ्रासिन पावडर व अ.व्हा दिव्याचा वापर, गुणधर्म याबाबत माहीती देण्यात आली. मी हजर केलेल्या नोटांना पोशि पांढरे यांनी अँन्थ्रासिन पावडर लावली व नोटांची घडी माझे शर्टच्या छातीवरील समोरील बाजुचे डावे खिषामध्ये ठेवुन दिल्या. त्यानंतर कडलग भाउसाहेब कोठे आहेत याबाबत पोनि गमे यांनी फोन करुन खात्री करावयास सांगितली असता, मी त्यांना माझे मोबाईल वरुन फोन लावला,'परंतु त्यांनी माझा फोन घेतला नाही. त्यानंतर मी कडलग यांचे हाताखाली काम करणारा अनिस षेख यास फोन लावला त्याने तो ट्रॅक्टर वर असुन कडलग भाउसाहेब थोड बाहेर आहेत. सात साडेसात पर्यंत येतील असे कळविले. परंतु अंधार होत असल्याने व माझे सोबत घरचे असल्याने मी घरी जात असल्याचे कळविले. त्यानंतर पोनि गमे यांनी मला, पंच व स्टाफला सदर कारवाई बाबत गोपनियता बाळगणे बाबत सुचना दिल्या व माझेजवळच्या अँ.पा.लावलेल्या लाचेच्या नोटा पंचासमक्ष ताब्यात घेवुन खाकी लिफाफ्यात टाकुन सिलबंद केल्या. त्यावर पोनि गमे व पंचांनी सहया केल्या. त्यानतर मी तिथुन घरी गेलो. त्यान्तर मी पोनि गमे यांना संपर्क साधला असता त्यांनी त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर येथुन बदली झाली असल्याचे सांगुन मला पोनि आल्हाट यांचा संपर्क नंबर दिला. त्यानंतर मी कामानिमित्त बाहेरगावी असल्याने पोनि आल्हाट यांना संपर्क केला नाही. दि.24/8/23 रोजी मी पोनि आल्हाट यांना संपर्क करून माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिगत सांगुन कडलग भाउसाहेब हे दिनांक 25/8/23 रोजी भेटणार असल्याचे सांगितले, त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला दि.25/8/23 रोजी दुचाकीसह श्रीरामपुर येथे सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत कळविले. त्याप्रमाणे मी हरेगाव ता.श्रीरामपुर येथे हजर असताना पोनि आल्हाट हे त्यांचे स्टाफसह तेथे आले व त्यांनी मला सुचना दिल्या. त्यानंतर पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन कडलग भाउसाहेबांना मी 11/42 वा फोन केला असता त्यांनी ते खैरी निमगाव येथे असुन श्रीरामपुर येथे येण्यास अर्धा तास लागेल असे कळविले त्यावेळी मी त्यांना श्रीरामपुर येथे आल्यावर फोन करण्यास सांगितले. त्यानंतर मी व सापळा पथक असे श्रीरामपुर येथे सुरक्षित ठिकाणी येवुन थांबलो. 13/03 वा चे सुमारास मी पुन्हा कडलग भाउसाहेबांना फोन केला व कुठ आहेत, आले का तुम्ही? असे विचारले असता त्यावेळी त्यांनी ते त्यांचे ऑफिसचे बाहेर असलेल्या दुकानात बसलेले असल्याचे सांगितले. त्यावेळी सर्वानुमते पाटबंधारे विभागाचे कार्यालयाचे ब्राहेर सापळा लावण्याचे ठरले. पोनि आल्हाट यांचे सुचनेवरुन

पोकाॅ पांढरे यांनी सोबतच्या कार्यालयीन साहित्य बॅगेतुन पोनि गमे व पंचांच्या सहया असलेला एक खाकी रंगाचा सिलबंद लिफाफा फोडुन त्यातील लाचेच्या नोटांची अ.व्हा.दिव्याच्या प्रकाषात तपासणी करुन सदरच्या नोटा या दि.3/7/23 रोजी पोनि गमे यांनी सापळापुर्व पंचनाम्यावेळी माझेकडुन ताब्यात घेतलेल्या नोटा असल्याची खात्री करुन दिली व सदरच्या नोटा माझ्या पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिषात ठेवुन दिल्या. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी मला,पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांना आवष्यक त्या सुचना देवुन व्हाईस रेकार्डर चालु करुन माझे गळ्यात अडकवुन देवुन मला व पंच नं1 याना कडलग भाउसाहेब यांची पाटबंधारे विभाग आॅफिसचे बाहेर असलेल्या दुकानात भेट घेण्यासाठी रवाना केले व आमचे पाठोपाठ सापळा पथकाने पाटबंधारे विभागाचे आॅफिस जवळ असलेल्या दुकानाचे आजुबाजुस सापळा लावला. मी तेथे कडलग भाउसाहेबांना फोन केला व कुठे आहे असे विचारता त्यांनी पुढे येण्यास सांगुन तुमच्याबरोबर एक दाढीवाला पोरगा आहे असे म्हणाले त्यावर मी तो माझा भाचा आहे असे म्हणालो. मी व पंच नं.1 असे कडलग यांचेजवळ गेलो व तेथुन चहा पिण्यासाठी साईनाथ टि हाउस येथे गेलो. त्यावेळी तेथे आमचेत पाण्याचे संदर्भात चर्चा झाली. त्या दरम्यान मी माझे पॅन्टचे खिषातील लाचेच्या नोटा उजव्या हाताने बाहेर काढुन कडलग भाउसाहेब यांचे समोर धरल्या असता, त्यांनी त्यांचे षेजारी बसलेले त्यांचे परिचयाचे इसमाकडे देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना ते माझे ओळखीचे नाही असे म्हणालो त्यावेळी कडलग यांनी त्यांचे बाजुला बसलेले इसम हे त्यांचे दाजी आहेत, त्यांचेकडे दया असे म्हणाले व माझेकडील लाचेच्या नोटांची घडी त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे दाजी यांचेकडे दिली असता मी लगेच मला ठरवुन दिलेला लाच स्विकारले बाबतचा पुर्वनियोजित इषारा केला. तो इषारा पाहताच पोनि आल्हाट, पंच नं.2 व सापळा पथकाची खात्री झाल्याने ते आमचे जवळ आले व कडलग भाउसाहेब व त्यांचे दाजी यांना पकडले. त्यानंतर पंच नं.2 यांनी कडलग यांचे दाजीचे ताब्यातुन लाचेच्या नोटा ताब्यात घेतल्या. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी पंचासमक्ष कडलग यांचे दाजी यांना त्यांचे नाव व पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव संजय भगवान करडे,रा.मोरगे वस्ती,श्रीरामपुर असे सांगितले. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी तेथेच चहाचे दुकानात आवष्यक त्या तपासण्या केल्या. त्यांनतर पोनि आल्हाट यांनी षासकिय विश्रामगृह श्रीरामपुर येथे येवुन पुढील कामकाज केले. शब्द संश्या जास्त अस्याने सोबत मुूळ फिर्यादी जोडली आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

HARSHVARDHAN GOVIND GAVALI(I (Inspector)) / PI **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District** (जिल्हा)**:**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**:**

सुरेश हिरामण सवाई

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ)**:**

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (**नाव**):** HARSHVARDHAN G
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** PI

पोलीस ठाणे अंमलदार
श्रीरामपूर शहर पो.स्टे.